# ५ सीलवत्थेरगाथा

(पालि तिपिटक साहित्यामधील अतिशय महत्त्वाचा पालि ग्रंथ म्हणजे 'थेरगाथा' होय. थेरगाथा हा ग्रंथ सुत्तपिटकाच्या खुद्दकनिकाया मधील आहे. यात तथागत बुद्धाच्या काळातील थेर अर्थात भिक्खूंचे जीवनानुभव संग्रहीत आहेत. अर्थात थेरगाथा म्हणजे तथागत बुद्धाच्या काळातील भिक्खूंचे एक प्रकारे स्वकथन म्हणता येईल. हा ग्रंथ जागतीक साहित्यामध्ये सुद्धा अतिशय महत्त्वाचा मानला जातो. थेरगाथेमधील जवळ जवळ सर्वच थेर हे अर्हत होते अशी बौद्ध मान्यता आहे. सीलवत्थेरगाथे-मध्ये सीलवभिक्खूचे जीवनानुभव आलेले आहेत. यात शीलाचे महत्त्व प्रतिपादन करण्यात आलेले आहे.)

---

सीलमेविध सिक्खेथ, अस्मिं लोके सुसिक्खितं ।
सीलं हि सब्बसम्पत्तिं, उपनायति सेवितं ।।

सीलं रक्खेय्य मेधावी, पत्थयानो तयो सुखे ।
पससं वित्तिलाभ च, पेच्च सग्गे पमोदनं ।।

सीलवा हि बहूमित्ते, सञ्ञमेनाधिगच्छति ।
दुस्सीला पन मित्तेहि, धसते पापं आचारं ।।

अवण्णं च अकित्तिंच, दुस्सीलो लभते नरो ।
वण्णं कित्तिं पससं च, सदा लभति सीलवा ।।

आदि सीलं पतिट्ठाच, कल्याणानं च मातुकं ।
पमुखं सब्बधम्मानं, तस्सा सीलं विसोधये ।।

वेलां च संवरं सीलं, चित्तस्स अभिहासनं ।
तित्थं च सब्बबुद्धानं, तस्मा सीलं विसोधये ।।

**(थेरगाथापालि, द्वारसकनिपातो, पालि प्रकाशन मंडळ, बिहार सरकार)**

---

**शब्दार्थ / सद्दत्थ**

**सिक्खेथ** - शिकलेला.
**उपनामेति (क्रि.)** - जवळ करतो, भेट घडवून आणतो.
**सीलं (नपु.)** - शील, सदाचरण.
**मेधावी (वि.)** - प्रज्ञावान, बुद्धिमान.
**वित्ति लाभ (स्त्री.)** - प्रीति लाभ.
**पमोद (पु.)** - आनंद, हर्ष.
**पापं (वि.)** - वाईट.
**पससं (नपु.)** - प्रशंसा, स्तुती.
**पतिट्ठा (स्त्री.)** - प्रतिष्ठित, स्थापित.
**विसोधये** - शुद्ध करणे.

**सुसिक्खितं (कृ.)** - सुशिक्षित.
**सेवित (कृ.)** - सेवा करता, सोबत करता, अभ्यास करता.
**रक्खेय्य** - रक्षिण्यायोग्य.
**पत्थयान (वि.)** - इच्छिता, कामना करता.
**पेच्च (अ.)** - मरणोत्तर, मृत्युनंतर.
**बहुमित्ते (पु.)** - अनेक मित्र.
**कित्ति (स्त्री.)** - कीर्ती, प्रसिद्धी.
**लभति** - प्राप्त होतो.
**कल्याणानं (वि.)** - कल्याण.
**वेला (स्त्री.)** - वेळ, समय.

## स्वाध्याय

**प्रश्न १ : सदाचरणाचे महत्त्व थोडक्यात लिहा.**

**प्रश्न २ : ‘‘सीलव’’चे जीवन चरित्र लिहा.**

**प्रश्न ३ : रूपे ओळखा.**

१) पापं.

२) मित्तेहि.

३) नरो.

४) बुद्धानं.

५) चित्तस्स.

❑❑❑